# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.03.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी पोर्ट लुईस इथं दाखल,
- रब्बी हंगामात एक हजार 645 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त अन्न धान्य उत्पादनाचा अंदाज
- आगामी आर्थिक वर्षासाठीचा महाराष्ट्राचा शेती, उद्योग, पर्यटन, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला अर्थसंकल्प विधीमंडळात सादर
- आणि
- जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्स स्पर्धेला आज नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू मैदानावर सुरुवात होणार

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज सकाळी पोर्ट लुईस इथं दाखल झाले. मॉरिशसचे पंतप्रधान नवीन चंद्र रामगुलाम यांनी विमान तळावर त्यांचं स्वागत केलं. मॉरिशस हा भारताचा हिंद महासागर क्षेत्रातला महत्त्वाचा शेजारी देश असून, त्याच्याबरोबर विविध क्षेत्रात भागीदारी वाढवण्यासाठी तसंच हिंदी महासागर क्षेत्रातील सुरक्षा आणि विकासासाठी मॉरीशसच्या नेत्यांबरोबर संवाद साधण्यासाठी उत्सुक असल्याचं मोदी यांनी मॉरिशसला निघताना नमूद केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या होणाऱ्या मॉरिशसच्या ५७ व्या राष्ट्रीय दिवस सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे आहेत. ते आज राष्ट्रपती धरम गोकुळ आणि मॉरिशसचे पंतप्रधान नवीन चंद्र रामगुलाम यांची भेट घेतील. रामगुलाम यांच्यासोबत ते विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. तत्पूर्वी पंतप्रधान मोदी मॉरिशसचे सर शिवसागर रामगुलाम आणि सर अनिरुद्ध जगन्नाथ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बोटॅनिकल गार्डनला भेट देतील.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पंजाबमधील भटिंडा इथं सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ पंजाब आणि ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) च्या दीक्षांत समारंभांना उपस्थित राहणार आहेत. संध्याकाळी पंजाब सरकारनं त्यांच्या सन्मानार्थ मोहाली इथं आयोजित केलेल्या एका नागरी स्वागत समारंभात सहभागी होतील. उद्या त्या चंदीगड इथं पंजाब विद्यापीठाच्या 72 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत. नव्या काळाच्या गरजेनुसार शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवण्यासाठी नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जात असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या काल हरियाणातल्या हिसारमधल्या गुरु जंभेश्वर विज्ञान आणि तंत्रज्ञान

विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलत होत्या. नव्या शैक्षणिक धोरणानुसार मिळणारं शिक्षण मुलांमधील कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देईल, असंही त्या म्हणाल्या.

**संसद**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र कालपासून सुरू झालं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी चालू आर्थिक वर्षासाठी विविध विभागांच्या खर्चासाठी 51 हजार 462 कोटी 86 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. सीतारामन यांनी लोकसभेत 2025-26 चा मणिपूरशी संबंधित अर्थसंकल्पही सादर केला. दरम्यान, काल कामकाजाला सुरुवात झाल्यावर लोकसभेत पीएम श्री योजनेच्या अंमलबजावणीबाबत तमिळनाडू सरकारवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलेल्या टिप्पणीच्या निषेधात द्रमुक सदस्यांनी गदारोळ केला. त्यामुळे सभागृहाचं कामकाज अर्धा तास तहकूब करण्यात आलं. मतदार याद्यांमधे गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत त्याविषयी चर्चेची मागणी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केली. राज्यसभेत रेल्वे सुधारणा विधेयक 2024 मंजूर करण्यात आलं. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत हे विधेयक मंजूरीसाठी सादर केलं. या विधेयकाद्वारे भारतीय रेल्वे बोर्ड कायदा, 1905 मधील सर्व तरतुदी रेल्वे कायदा, 1989 मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. लोकसभेनं या विधेयकाला आधीच मान्यता दिली आहे.

**कृषी मंत्रालय**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं 2024-25 या वर्षासाठी प्रमुख पिकांच्या उत्पादनाचा दुसरा आगाऊ अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार खरीप अन्नधान्य उत्पादन एक हजार 664 लाख मेट्रिक टन तर रब्बी अन्नधान्य उत्पादन एक हजार 645 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. या वर्षासाठी तांदळाचं उत्पादन एक हजार 206 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. 2023-24 मध्ये हे उत्पादन एक हजार 132 लाख मेट्रिक टन होतं . तूर आणि हरभऱ्याचं उत्पादन अनुक्रमे 35 पूर्णांक 11 लाख मेट्रिक टन आणि 115 पूर्णांक 35 लाख मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकार सातत्यानं काम करत असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ही आकडेवारी जाहीर करताना सांगितलं. कृषी मंत्रालयाच्या विविध योजनांमुळे शेतकऱ्यांना मदत आणि प्रोत्साहन मिळत असून त्यामुळे कृषी उत्पादनात विक्रमी वाढ होत असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं.

**जयशंकर-आर्मेनिया**

भारत आणि अर्मेनियाचे संबंध खूप जुने असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. अर्मेनियाचे परराष्ट्र मंत्री अरारत मिरझोयान यांच्याशी काल दिल्लीत झालेल्या भेटी दरम्यान डॉ. जयशंकर म्हणाले की, दोन्ही देशांमधील व्यापार आणि संरक्षण सहकार्यात वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्समध्ये सामील झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. अर्मेनियाचं पहिलं वृत्तपत्र भारतात प्रकाशित झालं होतं असं जयशंकर यांनी नमूद केलं.

**अर्थसंकल्प**

महाराष्ट्राचा आगामी आर्थिक वर्षाचा 7 लाख 20 कोटी रुपयांचा आणि सुमारे 45 हजार 891 कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सादर केला. विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी अर्थसंकल्प मांडला. आगामी आर्थिक वर्षात महसुली जमा पाच लाख 60 हजार 964 कोटी रुपये तर महसुली खर्च सहा लाख सहा हजार 855 कोटी रुपये अंदाजित असल्याचं, या अर्थसंकल्पात म्हटलं आहे. शेती, उद्योग, पर्यटन, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास क्षेत्रांसाठी या अर्थसंकल्पत भरीव तरतूद करण्यात आली आहे.  राज्याचं नवीन औद्योगिक धोरण, कामगार धोरण, गृहनिर्माण धोरण तसंच आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण लवकरच जाहीर करण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली.

**अर्थ संकल्प प्रतिक्रिया**

आगामी वर्षाचा अर्थसंकल्प हा विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणारा, लोकाभिमुख आणि संतुलित अर्थसंकल्प असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. तर हा अर्थसंकल्प सामान्य जनता, शेतकरी आणि लाडक्या बहीणींची फसवणूक करणारा असल्याची टीका विरोधकांनी केली आहे.

**लोकसभा- कामगार**

ई-श्रम पोर्टलवर 30 कोटी 68 लाखांहून अधिक असंघटित कामगारांची नोंदणी झाली असून, त्यात 53 टक्क्यांहून अधिक महिला आहेत, अशी माहिती लोकसभेत काल कामगार आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. असंघटित कामगारांचा व्यापक राष्ट्रीय माहितीसाठा तयार करण्यासाठी हे पोर्टल 2021 मध्ये सुरू करण्यात आले होते. आतापर्यंत विविध केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांच्या 13 योजना ई-श्रम पोर्टलमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. यामध्ये पंतप्रधान-स्वनिधी, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचा समावेश आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**गंगा**

महाकुंभमेळ्यादरम्यान प्रयागराजमधील त्रिवेणी संगम येथील गंगेतील पाणी स्नानासाठी योग्य असल्याचं सरकारनं पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालाचा हवाला देत लोकसभेत सांगितलं. महाकुंभमेळ्यादरम्यान सर्व देखरेख केलेल्या ठिकाणांवरील पाण्याची गुणवत्ता आंघोळीसाठी योग्य होती, असं त्यांनी नमूद केलं. सरकारनं  2022 ते 2025 दरम्यान, नदी स्वच्छ करण्यासाठी राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानाला एकूण सात हजार 421 कोटी रुपयांहून अधिक निधी उपलब्ध करून दिला होता, असंही त्यांनी सांगितलं.

**उत्तर रेल्वे विशेष गाड्या**

होळीच्या सणासाठी उत्तर रेल्वे 400 हून अधिक विशेष गाड्या सुरू केल्या आहेत. गरज भासल्यास आणखी विशेष गाड्या चालवल्या जातील, असं उत्तर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हिमांशू शेखर उपाध्याय यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना सांगितलं.  राष्ट्रीय राजधानीतील नवी दिल्ली, आनंद विहार आणि हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी सुरक्षा व्यवस्था, मिनी कंट्रोल रूम आणि प्रतीक्षालयांची स्थापना करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्स**

जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्स 2025 स्पर्धा आज दुपारी नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू मैदानावर सुरू होईल. तीन दिवसांच्या या स्पर्धेत 250 पॅरा-ॲथलीट्स सहभागी होतील, ज्यामध्ये 145 भारतीय आणि 20 देशांतील 105 आंतरराष्ट्रीय स्पर्धक असतील. ते 90 ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये भाग घेतील. यंदाची ही स्पर्धा भारतानं आतापर्यंत आयोजित केलेली सर्वांत मोठी पॅरा-ॲथलेटिक्स स्पर्धा आहे. भारतीय पथकाचे नेतृत्व पॅरिस 2024 पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते प्रवीण कुमार, नवदीप सिंग आणि धरमबीर करतील. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्सचा 12 वा हंगाम गेल्या महिन्यात दुबईत सुरू झाला आणि या जुलैमध्ये चेकियामधील ओलोमौक इथं समाप्त होईल. नवी दिल्ली स्पर्धा हा दुसरा टप्पा आहे. दुबईमध्ये पाच सुवर्ण, सहा रौप्य आणि तीन कांस्यपदकांसह १४ पदकं  जिंकत भारतीय संघानं उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**